**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३२ | बुधवार, दि.१५ ते २१ जुलै २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

## वाहन पार्किंग स्टँडचा घोळ;महसुलाचे मोठे नुकसान?



**गोंदिया:** स्थानिक प्रशासकीय इमारत मेन्टेन्स सहकारी संस्था मर्यादित, गोंदिया अंतर्गत असलेल्या दुचाकी व चारचाकी वाहन स्टँडच्या कंत्राटाचा गंभीर घोळ समोर आला आहे. मूळ कंत्राटाची मुदत संपून प्रदीर्घ काळ लोटला असतानाही प्रशासनाकडून नवीन निविदा प्रक्रिया किंवा नवीन करारनामा करण्यात आलेला नाही. यामुळे शासकीय मालमत्तेचा वापर विनाकरार सुरू असून, प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे महसुलाचे मोठे नुकसान होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

मिळालेल्या अधिकृत कागदपत्रांनुसार, सन २०२२ मध्ये प्रशासकीय इमारत मेन्टेन्स सहकारी संस्थेच्या आवारातील वाहन स्टँड भाड्याने चालवण्यासाठी निविदा काढण्यात आली होती. १२ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या सर्वसमक्ष सभेमध्ये ठराविक अटी व शर्तींनुसार ११ महिन्यांच्या अल्प कालावधीकरिता हे कंत्राट प्रतिमहा ११,८००/- रुपये दराने मंजूर करण्यात आले होते. अटी व शर्तींचा भंग झाल्यास कंत्राट कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार उपविभागीय अधिकारी तथा अध्यक्ष यांच्याकडे राखीव होता.

नियम व अटींनुसार सदर ११ महिन्यांचा करारनामा खूप आधीच संपुष्टात आला आहे. मात्र, त्यानंतर प्रदीर्घ काळ उलटूनही या जागेचा नवीन करारनामा करण्यात आलेला नाही किंवा पारदर्शक पद्धतीने पुनर्निविदा काढण्यात आलेली नाही. करार संपल्यानंतरही वाहन स्टँडची वसुली कोणाच्या संगनमताने आणि कोणत्या अधिकाराखाली सुरू आहे, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.

प्रशासकीय इमारतीमध्ये दररोज शेकडो नागरिक विविध शासकीय कामांसाठी येत असतात. त्यांच्याकडून वाहन पार्किंगचे शुल्क नियमित वसूल केले जाते. मात्र, हा पैसा योग्य पद्धतीने शासकीय खजिन्यात जमा होतो की नाही, याबाबत संभ्रम आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या या संस्थेच्या अशा ढिसाळ नियोजनामुळे स्थानिक प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नवीन निविदा प्रक्रिया तात्काळ राबवण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**वाहनतळाचा कंत्राट संपला आहे, ही बाब खरी आहे. मात्र, प्रशासकीय भवनात येणारी वाहने अस्ताव्यस्त लागू नयेत, यासाठी जुनाच कंत्राटदार काम बघत आहे. काम बघताना तो वाहनधारकांकडून वाहनासाठी आकारली जाणारी रक्कम घेईलच. यात दुमत नाही. लवकरच कमेटीची बैठक बोलावून नवा कंत्राट काढण्यात येईल. किंवा समितीच्या सल्लयानुसार वेळेवर योग्य निर्णय घेण्यात येईल.**

**– चंद्रशेखर खंडाईत**
**उपविभागीय अधिकारी, गोंदिया**

### तो निधी मुरतोय कुठे?

**प्रशासकीय इमारतीमध्ये दररोज शेकडो नागरिक विविध शासकीय कामांसाठी येत असतात. त्यांच्याकडून वाहन पार्किंगचे शुल्क नियमित वसूल केले जाते. मात्र, हा पैसा योग्य पद्धतीने शासकीय खजिन्यात जमा होतो की नाही, याबाबत संभ्रम आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या या संस्था कराराची जबाबदारी सांभाळत आहे. त्यामुळे शुल्काच्या नावावर गोळा होणारा निधी मुरतोय कुठे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून नवीन निविदा प्रक्रिया तात्काळ राबवण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.**




## बालपणीच्या असंसर्गजन्य आजारांवरील वृत्तांकन अधिक उत्तम करण्यासाठी आयोजित दोन दिवसीय माध्यम क्षमता-वृद्धी कार्यशाळेची सांगता

- **युनिसेफ इंडिया, पत्रसूचना कार्यालय पश्चिम क्षेत्र आणि एम्स नागपूर यांचा संयुक्त उपक्रम**
- **एम्स नागपूरच्या उत्कृष्टता केंद्रात माध्यम प्रतिनिधींनी प्रत्यक्ष तज्ज्ञांकडून घेतली माहिती**





**नागपूर:**बालपणी होणाऱ्या असंसर्गजन्य आजारांविषयीचे वृत्तांकन अधिक संवेदनशीलता आणि जागरूकतेने कसे करता येईल, यावर मंथन करण्यासाठी पश्चिम भारतातील ३० पेक्षा अधिक माध्यम प्रतिनिधी नागपूरच्या मएम्सफ्मध्ये (अखखचड) एकत्र आले होते. युनिसेफ इंडिया, पत्र सूचना कार्यालय (पश्चिम क्षेत्र) आणि एम्स नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या दोन दिवसीय क्षमता–बांधणी कार्यशाळेची सांगता झाली. कार्यशाळेदरम्यान पत्रकारांनी बालपणीच्या असंसर्गजन्य आजारांचे निदान, उपचार आणि व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते, याची प्रत्यक्ष माहिती घेतली.

एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी सांगितले की, "लहान मुलांमधील असंसर्गजन्य आजारांचा सुप्त कालावधी मोठा असतो आणि त्याची सुरुवात बालपणापासूनच होते. त्यामुळे याचे लवकर निदान होणे आणि सातत्याने काळजी घेणे आवश्यक आहे. एम्स ना–गपूर अशा आरोग्यसेवा मॉडेल्सच्या विकासासाठी कटिबद्ध आहे ज्यांची अंमलबजावणी संपूर्ण देशात करता येईल."युनिसेफ इंडियाच्या "कम्युनिकेशन, अॅडव्होकसी अँड पार्टनरशिप' विभागाच्या प्रमुख झाफ्रिन चौधरी म्हणाल्या, "प्रसारमाध्यमांतून जेव्हा लहान मुलांमधील असंसर्गजन्य आजारांबाबत अचूक माहिती पोहोचते, तेव्हा एका दुर्लक्षित समस्येवर प्रकाश पडतो. यामुळे आजारांचे लवकर निदान होण्यास मदत होते आणि सामाजिक कलंक दूर होतो."

### तथ्यधारित आणि संवेदनशील वृत्तांकन गरजेचे

**"सार्वजनिक आरोग्यविषयक वृत्तांकन जनजागृतीसाठी आवश्यक आकार देते. त्यामुळे पत्रकारांवर पुराव्याधारित तथ्ये लोकांपर्यंत पोहोचवण्याची मोठी जबाबदारी आहे. पालकांना लहान मुलांमधील आरोग्यविषयक आव्हाने समजून घेण्यास मदत होईल अशा बातम्या समोर येणे गरजेचे आहे."– स्मिता वत्स शर्मा (महासंचालिका, पत्र सूचना कार्यालय, पश्चिम क्षेत्र)**

### तांत्रिक उत्कृष्टता केंद्र आणि सहकार्य

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या मडीजीएचएसफ्चे अतिरिक्त महासंचालक डॉ. तु–षार एन. नाले यांनी शासकीय स्तरावरील असंसर्गजन्य आजार कार्यक्रमाचा आढावा सादर केला. या वर्षाच्या सुरुवातीला महाराष्ट्र सरकारने युनिसेफ इंडियाच्या धोरणात्मक सहकार्याने एम्स नागपूरसोबत सामंजस्य करार केला आहे, ज्याअन्वये एम्स नागपूर हे आता 'तांत्रिक उत्कृष्टता केंद्र' म्हणून कार्यरत असेल.

युनिसेफ महाराष्ट्रचे प्रमुख संजय सिंग म्हणाले की, "लहान मुलांमधील असंसर्गजन्य आजार आता दुर्मिळ राहिलेले नाहीत. ही सार्वजनिक आरोग्याची मोठी प्राथमिकता बनली आहे. आम्ही लवकर निदान आणि रुग्ण संदर्भ प्रणाली बळकट करण्यासाठी काम करत आहोत."

### प्रत्यक्ष भेटीतून अनुभव

कार्यशाळेदरम्यान पत्रकारांनी एम्स नागपूर येथील उत्कृष्टता केंद्राला भेट देऊन डॉक्टर, मुले आणि त्यांच्या पालकांशी थेट संवाद साधला व दीर्घकालीन देखभालीची वास्तविकता समजून घेतली. तसेच एका संवादात्मक प्रश्नमंजुषेत भाग घेऊन वृत्तकक्षासाठीच्या विशेष बातम्यांच्या पैलूंवर गटचर्चा केली. कार्यशाळेच्या सुरुवातीला एम्स नागपूरच्या बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. मीनाक्षी गिरीश यांनी बालपणातील आजारांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

### सप्टेंबर २०२६ पर्यंत मोहीम

हा उपक्रम केवळ कार्यशाळेपुरता मर्यादित नसून, सप्टेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या मएनसीडी सप्ताहाफ्पर्यंत (NCD Week) हा सातत्यपूर्ण उपक्रम सुरू राहणार आहे. याद्वारे बालकांमधील असंसर्गजन्य आजारांविषयीची

**बदलती जीवनशैली आणि वाढता धोका**

५ ते ९ वर्षे वयोगटातील मुले आणि १० ते १९ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलांमध्ये वाढत असलेल्या असंसर्गजन्य आजारांच्या (NCDs) धोक्याकडे लक्ष वेधणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.

**ग्रामीण व आदिवासी भाग:** पश्चिम आणि मध्य भारतातील आदिवासी तसेच ग्रामीण भागांमध्ये तज्ज्ञ उपचार आणि वेळेवर निदान न झाल्यामुळे हे आजार गंभीर स्वरूप धारण करतात.

**शहरी भाग:** शहरी भागात बैठी जीवनशैली, स्क्रीनचा वाढता वापर आणि खाण्यापिण्याच्या सवयींमुळे बालपणीच लठ्ठपणा, मधुमेह आणि मानसिक आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. दोन्ही क्षेत्रांत गुंतागुंत निर्माण होईपर्यंत हे आजार सहसा लक्षात येत नाहीत.

सार्वजनिक समज सुधारणे आणि पुराव्यांवर आधारित आरोग्य अह–वाल अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## रेलटोली उड्डाणपुलाचे गर्डर बसविण्याचे काम ३ दिवसांत सुरू करा–आमदार अग्रवाल

**गोंदिया :** शहराच्या दोन भागांना जोडणाऱ्या जुन्या उड्डाणपुलाच्या जागी उभारण्यात येत असलेल्या नवीन उड्डाणपुलाच्या कामात होत असलेल्या विलंबाबाबत आमदार विनोद अग्रवाल यांनी आज ना–गपूर येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक मुख्य अभियंत्यांसोबत बैठक घेऊन उड्डाणपुलाच्या कामाला तातडीने गती देण्याचे कडक निर्देश दिले.या बैठकीला आमदार विनोद अग्रवाल यांच्यासह मुख्य अभियंता श्री. मने, उपमुख्य अभियंता , कार्यकारी अभियंता श्री. रामटेके तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.



उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपुलाच्या कामातील विलंबाबाबत आमदार विनोद अग्रवाल यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली.

त्यांनी सांगितले की, या उड्डाणपुलाचे काम आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, विभागाच्या दिरंगाईमुळे या कामास विलंब होत आहे. कॉलमसाठी आवश्यक असलेले स्टील गार्डर घटनास्थळी उपलब्ध असतानाही काम सुरू करण्यात विलंब का होत आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच येत्या २ ते ३ दिवसांत गार्डर बसविण्याचे काम सुरू करण्याचे कडक आदेश त्यांनी दिले.

आमदार विनोद अग्रवाल यांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना ३१ ऑगस्टपर्यंत गार्डर बसविण्याचे काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर रेल्वेच्या अखत्यारीतील उर्वरित कामांना गती देण्यासाठी लवकरच रेल्वेचे महाव्यवस्थापक व विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्यासोबत बैठक घेऊन पुढील कामाला वेग देण्यात येईल, अशी माहिती आमदार विनोद अग्रवाल यांनी दिली.

## गडचिरोलीसाठी स्वतंत्र डाक विभागाची स्थापना

**गडचिरोली, :** गडचिरोली जिल्ह्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत डाक विभागाने चंद्रपूर डाक विभागातून गडचिरोली डाक विभागाचे प्रशासकीय विभाजन करण्याची अधिकृत घोषणा केली आहे. या निर्णयानुसार गडचिरोली आता स्वतंत्र डाक विभाग म्हणून कार्यरत होणार असून ही नवीन प्रशासकीय व्यवस्था बुधवार, दि. १५ जुलै २०२६ पासून लागू होणार आहे.

या प्रशासकीय पुनर्रचनेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील सर्व डाक कार्यालये स्वतंत्र गडचिरोली विभागीय प्रमुखांच्या नियंत्रणाखाली येणार आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निवारण होण्यास तसेच डाक, आर्थिक आणि डिजिटल सेवांचा अधिक प्रभावी लाभ नागरिकांना मिळण्यास मदत होणार आहे.

नवीन व्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दि. १५ जुलै २०२६ रोजी गडचिरोली टपाल विभागांतर्गत सर्व टपाल, बचत बँक आणि टपाल जीवन विमा यांसह सर्व प्रकारचे व्यवहार पूर्णपणे बंद राहतील. त्यानंतर दि. १६ जुलै २०२६ पासून सर्व सेवा पूर्ववत नियमितपणे सुरू करण्यात येणार आहेत.

## जीर्ण इमारतीतून पालिकेचा कारभार: गोंदिया नगर परिषदेत दिव्याखाली अंधार!

**३० कोटींचा निधी मंजूर होऊनही ५ वर्षांपासून बांधकामाकडे दुर्लक्ष; कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करण्यास हतबल**



**गोंदिया:** एकीकडे शहरातील धोकादायक आणि जीर्ण झालेल्या इमारतींना नोटिसा बजावून कारवाईचा बडगा उगारणाऱ्या गोंदिया नगर परिषदेचा स्वतःचा कारभार मात्र अत्यंत दयनीय आणि मोडकळीस आलेल्या इमारतीतून सुरू आहे. पालिकेच्या नव्या अत्याधुनिक इमारतीसाठी तब्बल ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊन पाच वर्षांचा कालावधी लोटला, तरीही अद्याप नव्या इमार–तीचा मुहूर्त सापडलेला नाही. परिणामी, मदिव्याखाली अंधारफ अशीच काहीशी अवस्था गोंदिया नगर परिषदेची झाली असून, कर्मचाऱ्यांना रोज जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे.

### निधी मिळूनही कामाला मिळेना गती!


नगर विकास विभागाने २०२१ मध्ये नगर परिषदेच्या नव्या सुसज्ज इमारतीसाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. या कामाच्या सुरुवातीच्या टप्प्यासाठी २ कोटी रुपयांचा प्रारंभिक निधी ४ ऑक्टोबर २०२१ रोजी वितरितही करण्यात आला. तत्कालीन भाजप नगराध्यक्ष अशोक इंगळे यांनी लवकरच सुसज्ज इमारत उभी राहणार असल्याची ग्वाही दिली होती. तर खासदार प्रफुल पटेल यांनी या निधीची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर राजकीय अनास्था आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे हे काम रखडले. स्थानिक आमदार आणि खासदारांनी केवळ कोट्यवधींच्या निधीचे आकडे दाखवून विकासाचा गवगवा केला, मात्र प्रत्यक्ष जागेवर आर्किटेक्ट नियुक्त करून कामाची वीट रचण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप आता नागरिक करत आहेत.

### स्वत:च्याच इमारती रामभरोसे

नगर परिषदेच्या सर्वेक्षणानुसार शहरात सध्या १२३ इमारती धोकादायक अवस्थेत आहेत आणि त्यांना पालिकेने नोटिसाही पाठवल्या आहेत. मात्र, ज्या कार्यालयातून या नोटिसा निघतात, त्याच इमारतीचे छत, स्लॅब आणि भिंतींना मोठे तडे गेले आहेत. १०० वर्षांपेक्षा अधिक जुनी झा–लेली ही इमारत कधीही कोसळण्याची भीती आहे. चार दिवसांपूर्वीच येथील कर व लेखा परीक्षण विभागाच्या छताचा भाग कोसळला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.

### नगर परिषदेच्या शाळांचीही दुरवस्था

केवळ मुख्य कार्यालयच नव्हे, तर नगर परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या १४ शाळांपैकी अनेक शाळांच्या इमारती अत्यंत जीर्ण झाल्या आहेत. काही इमारती पाडण्याची तर काहींच्या तातडीने दुरुस्तीची गरज आहे. शिक्षण विभागाने दुरुस्तीचे प्रस्ताव प्रशासनाकडे पाठवले आहेत, मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.



### विभाग इतरत्र हलवले: प्रशासनाची तात्पुरती मलमपट्टी

**ङ्गकार्यालयाची इमारत जीर्ण झाल्याची माहिती वरिष्ठांना देण्यात आली आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगर परिषदेचे काही विभाग शहरातील इंदिरा गांधी स्टेडियम परिसरातील इमारतीत, तर काही विभागांचे कामकाज टाउन शाळेतून चालवले जात आहे.ङ्ख**

**श्रीमती बी. एन. झलके (उपमुख्याधिकारी, गोंदिया नगर परिषद)**

### : पालिकेलाच नोटीस बजावण्याची वेळ?

सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी जीर्ण इमारती रिकामी करण्याचे आदेश देणाऱ्या नगर परिषदेला स्वतःच्या कार्यालयाची आणि शाळांची दुरवस्था का दिसत नाही, असा संतप्त सवाल गोंदियाकर विचारत आहेत. कोट्यवधींचा निधी धूळ खात पडून असताना केवळ लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे पालिकेचा कारभार रखडला आहे. त्यामुळे आता जीर्ण इमारतींच्या मालकांना नोटीस बजावणाऱ्या नगर परिषदेलाच नोटीस बजावण्याची वेळ आली आहे का? असाच सूर जनतेतून उमटत आहे.

## ३ ऑगस्टपासून "मंडल यात्रा" भंडाऱ्यातून प्रारंभ:जातिनिहाय जनगणनेसाठी ओबीसी एकवटणार




**नागपूर :** ओबीसींची जातिनिहाय जनगणना, मंडल आयोगाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी आणि इतर मागासवर्गीय तसेच भटक्या–विमुक्त समाजाच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी ङ्गसकल ओबीसी महामोर्चाफ्ने विदर्भभर "ओबीसी मंडल यात्रा' काढण्याचा निर्णय घेतला आहे. ७ ऑगस्ट "मंडल दिनm'चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली ही यात्रा ३ ऑगस्ट रोजी भंडारा येथून सुरू होणार असून ९ ऑगस्ट "क्रांतिदिनी' चंद्रपूर येथे भव्य महाअधिवेशनाने तिचा समारोप होणार आहे.

महामोर्चाचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, मंडल आयोगाच्या शिफारशींबाबत जनजागृती करणे,

ओबीसींच्या न्याय्य हक्कांसाठी जनमत तयार करणे आणि समाजाला संघटित करणे हा यात्रेचा प्रमुख उद्देश आहे. ३ ऑगस्टला भंडाऱ्यातून निघणारी यात्रा नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांतून मार्गक्रमण करणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात स्वागत समारंभ, जाहीर सभा, कोपरा सभा तसेच ओबीसी बांधवांशी थेट संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. ७ ऑगस्ट रोजी गोंदिया व ब्रम्हपुरी येथे "मंडल दिन' विशेष उत्साहात साजरा करण्यात येणार असून त्या दिवशी मंडल आयोगाच्या विचारांचा जागर आणि ओबीसी हक्कांसाठी मोठा एल्गार करण्यात येणार आहे.या यात्रेत राज्यातील विविध ओबीसी संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक आणि महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. यात्रेचा समारोप ९ ऑगस्ट "क्रांतिदिनी'चंद्रपूर येथे भव्य महाअधिवेशनाने होणार आहे.

## संपादकीय

### बालपणीचे असंसर्गजन्य आजार: भविष्यातील आरोग्यासाठी आजच सतर्कतेची गरज

आजच्या वेगवान, आधुनिक आणि तंत्रज्ञानस्नेही युगात लहान मुलांचे भावविश्व पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी गल्लीबोळात, मैदानावर घाम गाळणारी, खेळणारी मुले आज बंद खोलीत मोबाईल, टॅब्लेट किंवा कॉम्प्युटर स्क्रीनला चिकटलेली दिसतात. विसाव्या शतकापर्यंत लहान मुलांचे आजार म्हटले की प्रामुख्याने कुपोषण, न्यूमोनिया, जुलाब किंवा पोलिओ यांसारखे संसर्गजन्य आजार डोळ्यांसमोर यायचे. परंतु, एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत आणि विशेषतः आजच्या २०२६ च्या कालखंडात हे चित्र कमालीचे बदलले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे संसर्गजन्य आजारांवर आपण बऱ्याच अंशी नियंत्रण मिळवले असले, तरी जीवनशैलीतील बदलांमुळे पूर्वी केवळ प्रौढांमध्ये किंवा वृद्धांमध्ये आढळणारे असंसर्गजन्य आजार (Non-Communicable Diseases - NCDs) आता लहान मुलांमध्येही वेगाने पाय पसरत आहेत. बालपणीचा मधुमेह, लठ्ठपणा, दमा, हृदयविकाराची प्राथमिक लक्षणे आणि गंभीर मानसिक ताणतणाव यांसारखे आजार मुलांच्या कोवळ्या वयातच दार ठोठावत आहेत, ही केवळ एका कुटुंबाची नाही तर संपूर्ण देशाची सर्वात मोठी चिंताजनक बाब बनली आहे.आजची गंभीर परिस्थिती: स्क्रीन टाईम आणि डिजिटल व्यसनआजची परिस्थिती पाहिली तर असे दिसून येते की, मुलांचे बालपण मस्क्रीनफच्या चौकटीत बंदिस्त झाले आहे. पालकांचे व्यस्त वेळापत्रक आणि एकल कोंड्या कुटुंबपद्धतीमुळे (Nuclear Families) मुलांच्या हातात लहान वयातच स्मार्टफोन किंवा गॅजेट्स दिले जातात. यामुळे मुलांचा शारीरिक हालचालींचा वेळ शून्यावर आला आहे. तासनतास एकाच जागी बसून राहिल्यामुळे मुलांमध्ये 'सेडेंटरी लाईफस्टाईल' (शारीरिक श्रम नसलेली जीवनशैली) विकसित झाली आहे. ऑनलाइन गेम्सचे व्यसन आणि सोशल मीडियाचा अतिवापर यांमुळे मुलांची झोप अपूर्ण होत आहे. अपुऱ्या झोपेमुळे शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडते, ज्याचा थेट परिणाम मुलांच्या चयापचय शक्तीवर (Metabolism) होऊन ते विविध आजारांना बळी पडत आहेत.जंक फूडचे आक्रमण आणि लठ्ठपणा (Obesity)आजच्या जागतिकीकरणाच्या काळात गल्लोगल्ली मिळणारे जंक फूड, पिझ्झा, बर्गर, चिप्स आणि कार्बनयुक्त अति-गोड पेये (Soft Drink) मुलांच्या रोजच्या आहाराचा भाग बनली आहेत. आकर्षक जाहिराती आणि मइन्स्टंटफ संस्कृतीमुळे मुले घरच्या सकस अन्नापासून दुरावत आहेत. या चुकीच्या आहारपद्धतीमुळे बालपणीच्या लठ्ठपणाची (Childhood Obesity) समस्या एका महामारीसारखी पसरत आहे. आज शाळांमध्ये डोकावून पाहिल्यास वजन वाढलेली, लठ्ठ मुले मोठ्या संख्येने आढळतात. हा लठ्ठपणा केवळ दिसण्यापुरता मर्यादित नसून, तो शरीराच्या अंतर्गत रचनेला पोखरत आहे.लहान वयातच मधुमेह आणि उच्च रक्तदाबलठ्ठपणा वाढल्यामुळे पूर्वी दुर्मिळ मानला जाणारा 'टाईप-२ मधुमेह' (Type-2 Diabetes) आता शाळकरी मुलांमध्ये सर्रास पाहायला मिळत आहे. इन्सुलिनचा प्रतिकार करण्याची शरीराची क्षमता कमी झाल्यामुळे कोवळ्या वयातील मुलांना रोज औषधे किंवा इन्सुलिनचे डोस घ्यावे लागत आहेत. एवढेच नव्हे तर, रक्तवाहिन्यांमध्ये चरबी जमा होणे, मुलांचा रक्तदाब (Blood Pressure) वाढणे आणि रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण बिघडणे यांसारखे धक्कादायक प्रकार आज वैद्यकीय तपासणीत समोर येत आहेत. हे आजार मुलांचे भविष्य तर अंधारात ढकलत आहेतच, पण त्यांच्या आयुर्मानावरही गदा आणत आहेत.पर्यावरण आणि दम्याचे (Asthma) सावटआजच्या वाढत्या शहरीकरणामुळे हवेचे प्रदूषण प्रचंड वाढले आहे. हवेतील घातक वायू आणि धूलिकण लहान मुलांच्या नाजूक फुफ्फुसांवर थेट आघात करत आहेत. यामुळे लहान मुलांमध्ये दम्याचा (Asthma) आणि तीव्र ॲलर्जीचा त्रास वाढला आहे. आज प्रत्येक वर्गात दोन-तीन मुले अशी आढळतात जी खिशात 'इन्हेलर' घेऊन फिरतात. दम्यामुळे मुलांची फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी होते, ज्यामुळे त्यांना खेळताना किंवा धावताना धाप लागते आणि पर्यायाने ते शारीरिक खेळांपासून आणखी दूर जातात.स्पर्धा आणि मानसिक आरोग्याचे विदारक चित्रआजच्या परिस्थितीचे सर्वात दुःखद चित्र मुलांच्या मानसिक आरोग्यामध्ये दिसते. पालकांच्या गगनचुंबी अपेक्षा, अभ्यासाचे ओझे, गुणांची जीवघेणी स्पर्धा आणि त्यात भर म्हणून सोशल मीडियावरील मलाईक्सफआणि मव्ह्यूजफच्या आभासी दुनियेत स्वतःला सिद्ध करण्याची धडपड यामुळे मुलांचे मन कोमजून चालले आहे. लहान मुलांमध्ये नैराश्य (Depression), कमालीची अस्वस्थता (Anxiety), चिडचिडेपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव वाढला आहे. मानसोपचार तज्ज्ञांकडे येणाऱ्या लहान मुलांची संख्या आज विक्रमी पातळीवर पोहोचली आहे, ही आजच्या समाजाची सर्वात मोठी धोक्याची घंटा आहे.प्रतिबंधात्मक उपाय: घरातील आणि सामाजिक बदलअसंसर्गजन्य आजार हे संसर्गजन्य आजारांसारखे अँटीबायोटिक्स किंवा काही दिवसांच्या औषधांनी बरे होत नाहीत; ते बहुतांश वेळा आयुष्यभर सोबत राहतात आणि शरीराचे अवयव कमकुवत करतात. म्हणूनच, ङ्गप्रतिबंध हाच सर्वोत्तम उपायङ्ग हे सूत्र आपल्याला अवलंबावे लागेल.आहारात क्रांती: पालकांनी घरात प्रक्रिया केलेल्या (Processed) अन्नावर पूर्णपणे बंदी घालून मुलांना पालेभाज्या, फळे, तृणधान्ये असा घरगुती आणि संतुलित आहार देण्याचा आग्रह धरला पाहिजे.नियम पाळा, खेळू द्या: प्रत्येक मुलासाठी दररोज किमान एक तास मैदानी खेळ खेळणे किंवा कोणतीही शारीरिक हालचाल करणे बंधनकारक केले पाहिजे. शाळेच्या स्तरावरही क्रीडा प्रकारांना गुणांइतकेच महत्त्व मिळायला हवे.डिजिटल डिटॉक्स: कुटुंबात मनो गॅजेट टाईमफ ठरवला पाहिजे. पालकांनी स्वतः मोबाईल बाजूला ठेवून मुलांशी संवाद साधला पाहिजे, त्यांच्याशी खेळले पाहिजे.नियमित वैद्यकीय तपासणी: मुलांच्या वजनात किंवा वर्तनात अचानक होणाऱ्या बदलांकडे दुर्लक्ष न करता, वेळोवेळी डॉक्टरांचा आणि तज्ज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे.निष्कर्षलहान मुले हे कोणत्याही देशाचे आणि समाजाचे खरे भांडवल आणि भविष्य असतात. जर हे बालपणच आजारांच्या आणि औषधांच्या सावटाखाली राहिले, तर आपण एका सशक्त आणि समृद्ध देशाची कल्पना कशी करू शकतो? बालपणीच्या असंसर्गजन्य आजारांना रोखणे ही केवळ डॉक्टरांची किंवा पालकांची वैयक्तिक जबाबदारी नाही, तर ती संपूर्ण शिक्षण व्यवस्था, सरकार आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आज आपण मुलांच्या जीवनशैलीत केलेले सकारात्मक बदल उद्याच्या पिढीला एक निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य बहाल करतील, यात शंका नाही.

# मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला यांची अतिदुर्गम पीएचसी दरेकसाला आकस्मिक भेट




**गोंदिया :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ चंद्र दोंतुला यांनी मंगळवारी सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसाला आकस्मिक भेट देवुन आरोग्य संस्थेत देत असलेल्या आरोग्य सेवा व सुविधांची पाहणी केली.

भेटी दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रातील आतील व बाहेरील परिसराची स्वच्छता, बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी) दरम्यानच्या वेळेत मिळत असलेल्या रुग्ण सुविधा, प्रयोगशाळेत करण्यात येत असलेल्या विविध चाचणींची माहिती, एनसीडी कार्यक्रम अंतर्गत मधुमेह व रक्तदाब रुग्णांची माहिती, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे नियमित गावनिहाय भेटीचे नियोजन, पर्यवेक्षांनी उपकेंद्रांना भेटी, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा, संस्था प्रसुती, औषधीसाठा, किटकजन्य कार्यक्रम, साथरोग प्रतिबंधात्मक कार्यवाही, नियमित लसीकरण, अंगणवाडी तपासणी, सॅम व मॅम बालकांची माहीती आदी बाबींचा आढावा घेवुन मुख्यालयी राहणे, रुग्णसुविधा गुणवत्तापुर्वक देणे, पावसाळ्या दरम्यान कार्यक्षेत्रातील पुरग्रस्त गावातील गरोदर मांताना गुंतागुंती होण्यापुर्वी ग्रामीण रुग्णालयात भरती करणे, सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी चांगल्याप्रकारे करण्यात यावी, कर्मचारी यांनी दौरा दैनंदिनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, आरोग्य संस्थाचे रेकॉर्ड अद्यावत करुन मुख्यालयी राहण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या.

भेटी दरम्यान त्यांचेसोबत सालेकसा पंचायत समिती गटविकास अधिकारी संजय पुरी, सहाय्यक गटविकास अधिकारी सोनकुवर, सालेकसा तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील आत्राम, प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसाचे वैद्यकिय अधिकारी डॉ. पारस गिरी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी उन्नती उप्पलवार यांचेसह प्राथमिक आरोग्य केंद्राचे विपिन खापर्डे, सरिता पारधी, सुंदराबाई भगत, पूजा बोलणे, दिपेश चव्हाण व आकाश बडोले तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

## रेल्वे विभागाने विविध १२ पुलांवर लावली जलस्तर निरीक्षण प्रणाली



**गोंदिया :** पावसाळ्यात पूलांवरील पाण्याचे प्रमाण सतत आणि अचूकपणे मोजण्यासाठी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेने आधुनिक वॉटर लेव्हल मॉनिटरिंग सिस्टम (जलस्तर निरीक्षण प्रणाली) लावली आहे. सेंसर-आधारित ही प्रणाली सध्या विभागातील १२ महत्त्वाच्या रेल्वे पुलांवर लावण्यात आली असून, ती २४ तास रिअल-टाइम पाण्याचे पातळ्याचे निरीक्षण करून सुरक्षित रेल्वे वाहतूक करण्यास मदत पूर्ण ठरणार आहे.

पूर्वी मीटर गेजवर मॅन्युअलपणे पाण्याची नोंद घेतली जात होती. त्यामुळे वाचनात उशीर होणे आणि चुका होण्याची शक्यता निर्माण होत असे. अचानक पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यास वेळेवर माहिती मिळत न राहिल्याने पूल आणि ट्रॅकच्या स्थितीचे त्वरीत मूल्यमापन करणे कठीण व्हायचे. हे लक्षात घेऊन रेल्वेने हे आधुनिक सिस्टम बसविले आहे. या सेंसर आधारित तंत्रज्ञानाद्वारे पुलांवरचे पाणी अखंडपणे पाहिले जाते आणि ते ट्रॅक मॅनेजमेंट सिस्टमशी जोडलेले असते. नदीचा पाण्याचा स्तर पूर्वनिर्धारित सूचना किंवा जोखमीच्या पातळीवर पोहोचल्यास किंवा त्यात लक्षणीय बदल झाला असता याप्रणालीद्वारे त्वरित संबंधित अधिकाऱ्यांच्या आणि अभियंत्यांच्या मोबाइलवर एसएमएस अलर्ट पाठविते. त्यामुळे आवश्यक त्या सुरक्षात्मक पावल्या वेळेत घेता येतात आणि रेल्वे वाहतूक सुरळीत राहते. या प्रणालीमध्ये सहायक मंडळ अभियंता, रेल पथ निरीक्षक आणि इतर अधिकृत अधिकारी यांचे मोबाइल नंबर नोंदविले आहेत.

पाण्याच्या पातळीत प्रत्येक महत्त्वपूर्ण बदलाची माहिती थेट संबंधितांपर्यंत पोहोचते, ज्यामुळे त्वरित निर्णय घेणे आणि कार्यवाही करणे सोपे होते. मुंडीकोटा-तुमसर स्टेशन्सदरम्यान पूल, कन्हान-कामठी स्टेशन्सदरम्यान पूल, वडसा-ब्रह्मपुरी स्टेशन्सदरम्यान पुलासह इतर आठ पुलांचा समावेश आहे.

## जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जिल्ह्यात विशेष जनजागृती सप्ताह



**गोंदिया :-** जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त राज्य कुटुंब कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात ११ ते १८ जुलै या कालावधीत विशेष जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत कुटुंब नियोजन, माता-बाल आरोग्य संवर्धन आणि लोकसंख्या स्थिरीकरण याबाबत व्यापक जनजागृती केली जाणार आहे. यावर्षीच्या अभियानाची संकल्पना "दोन जन्मांतील योग्य अंतर - सुखी, निरोगी कुटुंबाचा आधार" अशी असून, निरोगी माता, सुदृढ बालक आणि समृद्ध कुटुंब घडविण्यासाठी कुटुंब नियोजनाचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य उपकेंद्रे तसेच आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये समुपदेशन शिबिरे, गृहभेटी, लाभार्थी ओळख, निश्चित दिवस सेवा आणि माहितीपत्रकांचे वितरण अशा विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

तसेच महिला व पुरुष नसबंदी, तांबी (IUCD), प्रसूतीपश्चात तांबी (PPIUCD), गर्भनिरोधक इंजेक्शन (अंतरा), गर्भनिरोधक गोळ्या, निरोध आदी आधुनिक कुटुंब नियोजन साधनांची माहिती व सेवा नागरिकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये कुटुंब नियोजन साधनांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र दाम्पत्यांनी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधून सुरक्षित, प्रभावी व विनामूल्य कुटुंब नियोजन सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले यांनी केले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले यांच्या नेतृत्वात सर्व ग्रामीण रुग्णालयात मोफत कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅम्पसचे आयोजन करण्यात आले आहे हे विशेष.

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्ताने मार्गदर्शन करताना "नियोजित कुटुंब, निरोगी माता आणि सुदृढ बालक हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहेत," असेही जिल्हा शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले यांनी नमूद केले आहे.

जागतिक लोकसंख्या नियंत्रण सप्ताह निमित्ताने पोस्टर स्पर्धा स्लोगन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे तरी त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन फॅमिली प्लॅनिंग सेल तर्फे केले आहे.

### निवृत्तीवेतन धारकांसाठी महा-उपलब्धी ॲप कार्यान्वित

**गोंदिया :** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारक तसेव कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनासंबंधित विविध माहिती व सेवा एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन, वित्त विभाग संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महा-उपलब्धी हे मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.


## एसआयआर प्रक्रियेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नागपूर :** राज्यात सुरू असलेल्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (SIR) प्रक्रियेची प्रभावी, पारदर्शक व वेळेत अंमलबजावणी व्हावी, तसेच नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी SIR ॲडव्होकेट्स वर्किंग कमिटी, नागपूरच्या वतीने नागपूरचे जिल्हाधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनामध्ये एसआयआरबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविणे, नागरिकांना अर्ज भरण्याबाबत योग्य मार्गदर्शन करणे, विधानसभा निहाय बीएलओ व हेल्पलाईन क्रमांक प्रसिद्ध करणे, बीएलओंना आवश्यक मनुष्यबळ व सहकार्य उपलब्ध करून देणे, बीएलओ मॅन्युअलचे काटेकोर पालन करणे, स्वयंसेवी संस्था व सामाजिक संघटनांचा सहभाग वाढविणे तसेच संपूर्ण प्रक्रियेचा नियमित आढावा घेण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी ॲड. कमल सतुजा, ॲड. नितीन देशमुख, ॲड. विनोद खोबरे, ॲड. समीक्षा गणेशे, ॲड. जितेंद्र हिंगवे, ॲड. लक्ष्मी मालेवार, ॲड. जितेंद्र वेळेकर, ॲड. मोनाली अपर्णा, ॲड. रुचिता मुळे आणि ॲड. बागडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.SIR ॲडव्होकेट्स वर्किंग कमिटीने नागरिकांमध्ये एसआयआर प्रक्रियेविषयी जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे व प्रशिक्षण उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला असून, प्रशासनाने निवेदनातील सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## कोट्यावधींचे महसूल कर्मचारी निवासस्थाने ठरली शोभेची वास्तू



**घोट :-** घोट परिसरात महसूल विभागाच्या वतीने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेली तलाठी व मंडळ अधिकारी कर्मचारी निवासस्थाने आजही वापराअभावी ओस पडलेली आहेत. २०११ साली तत्कालीन गृहमंत्री तथा पालकमंत्री आर. आर. पाटील यांच्या पुढाकारातून जिल्ह्यात विविध ठिकाणी अशा इमारतींना मंजुरी देण्यात आली होती.

घोट येथे उभारण्यात आलेल्या या इमारतींचे मुख्य बांधकाम पूर्ण झाले असले तरी रंगरंगोटी, इलेक्ट्रिक फिटिंग, दरवाजे-खिडक्या आदी कामे अपूर्ण राहिल्याने त्या आजपर्यंत वापरात आलेल्या नाहीत. परिणामी, गेल्या जवळपास १० ते १५ वर्षांपासून या वास्तू बेवारस अवस्थेत पडून असून अक्षरशः मशोभेची वास्तूफ बनल्या आहेत. चामोर्शी तालुक्यात महसूल मंडळ स्तरावर सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनाने मोठा निधी खर्च करून या इमारती उभारल्या. मात्र, संबंधित विभागाकडून बांधकाम पूर्णत्वास नेण्यात आले नसल्याने आणि अधिकृत हस्तांतरण न झाल्याने त्या वापरातच आलेल्या नाहीत. देखभालीअभावी इमारतींची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. परिसरात झुडपे वाढून संपूर्ण जागा ओसाड व निर्जन झाल्याचे चित्र दिसून येत आहे. काही ठिकाणी इमारतींना जीर्णतेची चिन्हेही स्पष्टपणे दिसत आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेल्या या प्रकल्पाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मजनतेच्या पैशांचा हा सरळ अपव्यय आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे.

दरम्यान, संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन उर्वरित कामे पूर्ण करून इमारतीचा त्वरित वापर सुरू करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### महिला लोकशाही दिनाचे आयोजन २० जुलैला

**गोंदिय :** जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी दि.२० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमून्यात नसणारे व आवश्यक कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार/निवेदने वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर ते अर्ज स्विकारण्यात येणार नाही. तरी सर्व पिडीत महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात व्यक्तीशः येऊन आपली तक्रार तीन प्रतीत सादर करावी. अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खोली क्र.३६, जयस्तंभ चौक, गोंदिया या कार्यालयात नि:शुल्क प्राप्त होईल.

तालुका स्तरावर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यासाठी संबंधित तालुक्याच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) यांच्याकडे अर्ज सादर करावे.

## नवचेतना, आधारशीला अंगणवाडी पर्यवेक्षिका व सेविकाचे प्रशिक्षण



**तिरोडा :** जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा तालुक्यांतील नवचेतना व आधारशीला अंतर्गत शासनाच्या आदेशान्वये प्रथम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व प्रवीण प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. १०) पर्यवेक्षिका व डेमो अंगणवाडीच्या अंगणवाडी सेविकांचे एकदिवसीय प्रशिक्षण पार पडले.

यावेळी उद्घाटक म्हणून जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी झेनितचंद्रा दोंतुला, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कीर्तीकुमार कटरे, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, गटविकास अधिकारी जितेंद्र देवरे, सहायक गटविकास अधिकारी मोकिंदा देडगे, प्रियंका किरणापुरे व बाल विकास प्रकल्प अधिकारी विनोदकुमार चौधरी तसेच प्रथम फाउंडेशनचे विभाग प्रमुख गजानन सरोदे, जिल्हा समन्वयक जितेंद्र कोटांगले उपस्थित होते.

प्रशिक्षण प्रामुख्याने तीन भागांत घेण्यात आले. स्वागत मेळावा, बाल मेळावा व प्रशिक्षण आदींचा त्यात समावेश होता.

या प्रशिक्षणाचा फायदा अंगणवाडीतील बालकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत अंगणवाडीच्या शिक्षणामध्ये सहभाग वाढविणे, अंगणवाडीतील बालकांचा व पालकांचा अधिक सहभाग वाढविणे तसेच शाळापूर्व तयारीबाबत बालकांमध्ये जागरूकता वाढविण्यास होईल.

जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी झेनितचंद्रा दोंतुला यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विनोदकुमार चौधरी यांनी केले. संचालन उषा आगाशे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रियंका किरणापुरे यांनी मानले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# देशाचा आधारस्तंभ निखळत आहे



शिक्षक म्हणजे समाजाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राचे निर्माते आहेत. म्हणूनच देशोदेशी प्रत्येक समाजात शिक्षकाला एक वैशिष्ट्यपूर्ण असे आदराचे आणि महत्त्वाचे स्थान आहे. कारण कोणत्याही समाजाचा कायापालट जसा शिक्षणामुळे होतो तसा आणि तितका कुठलाही घटक आधुनिकीकरणासाठी प्रभावी असत नाही. आधुनिक जग आणि युरोप अमेरिका जपान चीन आदि देशांच्या आमूलाग्र बदलाच्या मुळाशी शिक्षणच कारणीभूत ठरले असल्याचे मान्य केले आहे. भारतात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण गती घेऊ लागल्यानंतर ज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भौतिक प्रगतीसह सामाजिक सांस्कृतिक विकासाच्या वाटा विस्तारत गेल्या. अशा महत्वपूर्ण शिक्षणव्यवस्थेत शिक्षक हा त्या व्यवस्थेचा जणू कणाच असतो. शिक्षणव्यवस्थेला खंबीरपणे मजबूत करणारा शिक्षक जर त्याच्या कर्तव्यापासून भरकटला तर शिक्षणव्यवस्थेचा ढाचा खिळखिळा व्हायला वेळ लागत नाही. या जाणिवेतून हैराण झालेले शिक्षक मात्र शिक्षण वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत.

काल परवा मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रामध्ये शिक्षकांनी आंदोलन करून शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाकडे समाजाचं लक्ष वेधण्याचं काम केलं. संपूर्ण महाराष्ट्रात जागोजागी शिक्षकांनी शाळा बंद आंदोलन करून शिक्षणव्यवस्थेच्या विरोधामध्ये एल्गार पुकारून शिक्षणावर आले असलेले संकट उजागर करण्याच काम केलं. खर म्हणजे शिक्षण हे राष्ट्र घडवण्याचं काम करत असते, आणि त्या शिक्षण व्यवस्थेमध्ये शिक्षक हा आधारस्तंभ मानला जातो आणि अशा या आधारस्तंभाचंच खच्चीकरण सर्व स्तरावर होत असलेले दिसत असून त्या विरोधामध्ये शिक्षक उभे ठाकलेले आहेत. शिक्षक हा उच्चशिक्षित निहित अर्हता धारण करून त्या पदावर सेवा भरतीच्या प्रक्रियेद्वारे पोहोचलेला असतो तरी देखील मध्येच त्याची परीक्षा घेऊन त्याला पात्रता सिद्ध करण्याचा लाजीरवाणा प्रकार होत आहे. त्या विरोधामध्ये शिक्षकांचा लढा होय. टीईटी ही परीक्षा शिक्षकांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. शिक्षक ज्याकरीता आंदोलन करत आहे त्या शिक्षणाकडे होत असलेले एकूणच व्यवस्थेचे दुर्लक्ष हा चिंता विषय आहे.

त्यामध्ये शिक्षकांच्या मागे लावलेले डखठ वगैरे तत्सम इतर कामे त्यामुळे शिक्षकांना शिकवण्यासाठी वेळ मिळत नाही ही नित्याची ओरड कोणी ध्यानात घेत नाही त्यामुळे शिक्षकच आता शाळा वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वेळ मिळावा विद्यार्थ्यांच्या वाट्याचा वेळ इतर कामांमध्ये दिल्यामुळे विद्यार्थ्यांवर एक प्रकारे अन्याय होतो, तो विद्यार्थ्यांवरील अन्याय कमी करण्यासाठी लढायला सिद्ध झालेला आहे. वास्तविक पहाता शिक्षण हे समाज घडवण्याचे साधन आहे, अशा बहुमौलिक शिक्षणासाठी लढण्याची समाजाची जबाबदारी आहे.काल एका सरपंच-लोकप्रतिनिधींनी, त्यांची पद्धत चूक बरोबर काही असेल पण, शिक्षकांच्या आंदोलनाची अनिवार्यता अधोरेखित केली. ज्या शिक्षणामधून समाज सुशिक्षित होतो समजदार होतो आणि एक सुशिक्षित समाजाच संपन्न देश तयार होतो, त्या शिक्षणाची दुरवस्था समोर येत आहे. आणि म्हणून सामाजिक चळवळी शिक्षणव्यवस्थेत शिरलेल्या आत्मघातकी प्रवृत्ती विरोधात नेहमी पोटतिडकीने ओरड करत असतात.सावित्रीबाई आणि म.फुले यांनी मुलींच्या आणि शूद्रातिशूद्र मुलांसाठी शाळा काढल्या. स्त्रियांना आणि दलित आदिवासी ओबीसी भटक्या समाजासाठी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची मुहुर्तमेढ रोवली, छत्रपती शाहू महाराज,सयाजीराव गायकवाड महाराज, म. धोंडो केशव कर्वे, शिक्षणमहर्षी भाऊराव पाटील,महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर बॅ. पंजाबराव देशमुख, बापूजी साळुंखे यांनी अथक परिश्रम घेतले. संवैधानिक तरतुदीनुसार ,मोफत व सक्तीचे शिक्षण व सार्वत्रिकीकरणाला बळ मिळत गेले. गाव तिथे शाळा निघाल्या. या शाळा बंद पडू नये,अर्थात शिक्षण वाचवण्यासाठी जनआंदोलन उभे राहिले पाहिजे. शिक्षकांचे आंदोलन हे समाजाचे आंदोलन आहे हे ध्यानात घेऊन शाळा बंद पडू नये हे अधिक महत्त्वाचे आहे. गावोगावी असलेल्या शाळा, शहरातील शासकीय शाळा बंद पडल्या तर स्त्रीशुद्रातीशुद्र समाज पुन्हा अज्ञानाच्या खाईत लोटला जाईल, याचे भान शिक्षकांना अधिक आहे. तसे होऊ नये म्हणून शिक्षक खंबीरपणे लढू लागला आहे. त्याला समाजाच्या सर्व स्तरातून समर्थन असणे आवश्यक आहे.

**अनुज हुलके**
**नागपूर**

# क्षेत्राच्या विकासात दोन्ही जनप्रतिनिधीची भूमिका महत्वाची ठरणार : खा. पटेल



**भंडारा :** आपल्या आशीर्वादाने केंद्र व राज्यात महायुतीची डबल इंजिनची सरकार आहे. या सरकारच्या माध्यमातून विकासाला गती मिळाली आहे. राज्यातील शेतकरी आर्थिक डबघाईस जाऊ नये यासाठी कर्जमुक्ती योजनेची अंबलबजावणी केली जात आहे. शिवाय जेव्हा जेव्हा शेतकरी असो किवा सर्वसामान्य नागरिक किंबहुना भगिनी अडचणीत आल्या, तेव्हा महायुतीची सरकार त्यांच्या पाठीशी खंबिरपणे उभी राहत आहे. हे सर्वांग

प्रगतीच्या पाहुलखुणा आ-हेत.

महायुतीने विदर्भाला मान देऊन तुमच्यातला प्रतिनिधी राजेंद्र जैन यांना राज्यसभेत तर सर्वसामान्य म्हणून ओळख असलेला अविनाश ब्राह्मणकर यांना महायुतीने विधान परिषदेत संधी दिली आहे. या दोन्ही जनप्रतिनिधींना मिळालेली संधी म्हणजेच गोंदिया भंडारा सह पूर्व विदर्भाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी महत्वाचे ठरणार आहे असे प्रतिपादन खा. प्रफुल पटेल यांनी केले.

भंडारा येथे महायुती सत्कार समितीच्या वतीने राज्यसभेचे नवनिर्वाचित खा. राजेंद्र जैन व विधानपरिषदेचे आ. अविनाश ब्राह्मणकर यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खा. प्रफुल पटेल तर उद्?घाटक म्हणून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ पंकज भोयर, आ. डॉ. परिणय फ ुके तसेच आ. राजकुमार बडोले, आ. विजय रहांगडाले, आ. नरेंद्र भोडेकर, आ. राजू कारेमोरे, आ. संजय पुराम, वीरेंद्र अंजनकर, लायकराम भेडारकर, सु-नील फुंडे, धनंजय दलाल आदी मान्यवर उपस्थित होते.

सत्कार सोहळ्याप्रसंगी भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील महायुतीचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ता तसेच विविध संघटनांचे, सेल, आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसाठी विविध योजनांचा लाभ; कोट्यवधींचे अनुदान वितरण

**गोंदिया :** राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी गोंदिया जिल्ह्यात करण्यात येत आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (झच-घखडअछ) योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार रुपये तीन हप्त्यांमध्ये देण्यात येतात. या योजनेचा २१ वा हप्ता १९ नोव्हेंबर २०२५ रोजी वितरित करण्यात आला असून जिल्ह्यातील २,११,७७३ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली.

राज्य शासनाच्या ङ्गनमो शेतकरी महासन्मान निधीङ्ग योजनेमुळे शेतकऱ्यांना आणखी ६ हजार रुपयांची भर पडत असून, या योजनेचा सातवा हप्ता ९ सप्टेंबर २०२५ रोजी वितरित करण्यात आला आहे.

कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा यासाठी कृषी यांत्रिकीकरणावर भर देण्यात येत आहे. विविध योजनांतर्गत एकूण ७४८ लाभार्थ्यांना ६ कोटी ८२ लाख ७९ हजार ७१२ रुपयांचे अनुदान थेट खात्यात (उइढ) जमा करण्यात आले आहे. यामध्ये केंद्र व राज्य पुरस्कृत तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनेचा समावेश आहे.दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात रब्बी हंगामात सरासरी २३,७२३ हेक्टर क्षेत्र असताना सन २०२४-२५ मध्ये ३१,०६७.४७ हेक्टर (१३०.९५ टक्के) क्षेत्रावर पिकांची लागवड करण्यात आली. हरभरा, गहू, मका, उडीद, मसूर, मोहरी यांसह विविध पिकांचा यात समावेश आहे. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत असून अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व झाल्यास १ ते २ लाख रुपयांपर्यंत मदत दिली जाते. चालू वर्षात जिल्ह्यात १२४ प्रस्ताव मंजूर झाले असून ७५ लाभार्थ्यांना १ कोटी ५० लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. जानेवारी २०२६ पासून ते ३० जून २०२६ पर्यंत आणखी ७६ शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना त्यांच्या अडचणीच्या वेळी आर्थिक लाभ मिळणार आहे.


### को.वि.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, देवरी यांचे कार्यालय

प्रकरण क्रं./एम.आर.सी.०१/२०२५-२६
मौजा-देवरी ता.देवरी जि.गोंदिया
दिनांक-१५/०१/२०२५

### जाहिरनामा

ह्या जाहिरनाम्याद्वारे सर्व लोकांना माहितीस्तव जाहीर करण्यात येते की अपिलार्थी श्री. मधुकर पांडुरंग ब्राम्हणकर,रा.देवरी ता.देवरी जि.गोंदिया यांनी त्यांची त्यांची आई मोताबाई पांडुरंग ब्राम्हणकर यांची मृत्यू नोंद दिनांक १४/०९/२०१४ रोजी न.प.देवरी ता.देवरी जि.गोंदिया येथे करण्याकरीता मागणी केली आहे. ज्या कोणास यावर आक्षेप घ्यावयाचे आहे. त्यांनी आपले लेखी आक्षेप जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत न चुकता सादर करावे. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जावर कोणताही विचार करण्यात येणार नाही ह्याची नोंद घ्यावी.

**उपविभागीय अधिकारी,**
**देवरी**


# गुमडोह कालव्याच्या दळणवळण मार्गावर शेतपांदण रस्ता




**गोरेगाव** - तालुक्यातील बोरगाव ते सुखपूर या गावी आवागमन करण्याकरिता गुमडोह कालव्याच्या पाळीवरून दळणवळण रस्ता आहे. या रस्त्यावर मातोश्री शेतपांदण रस्ता बांधकाम केला जात आहे. हे बांधकाम अर्धवट असल्याने गावकऱ्यांना आवागमन करता येत नाही. गैरसोयीचा साम ना करावा लागत आहे.या रस्ता बांधकामाच्या चौकशीचे आदेश तिरोडा उपविभागीय अधिकारी यांनी आता दिले आहेत.

जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाअंतर्गत गुमडोह तलावाचे पाणी कालव्याद्वारे सुखपूर, बोरगाव, नवरगाव, बाघोली, चोपनटोली, डोंगरूटोला या गावांतील शेतीला वाटप करण्यात येते. हे पाणी वाटप सुरळीतपणे करता यावे म्हणून २००५ ला पाणी वाटप समिती तयार करण्यात आली असून ही समिती कालव्यातून पाणीपुरवठा करत आहे. याच कालव्यावरून सुखपूर, बोरगाव व इतर गावांतील नागरिकांना सुखपूर येथे जाण्या-येण्याकरिता दळणवळण रस्ता आहे. या रस्त्यावर मातोश्री शेतपांदण रस्ता बांधकाम मंजूर करण्यात आला. हे बांधकाम सुरू करता यावे म्हणून पाणीपुरवठा समिती व काही गावकऱ्यांनी जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागाकडे रस्ता बांधकाम करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्राची मागणी केली. ही मागणी लघु पाटबंधारे विभागाने मंजूर करून प्रमाणपत्र दिल्याने मातोश्री शेतपांदणचे बांधकाम दळणवळण रस्त्यावर कंत्राटदारांनी सुरू केले आहे.

शेतकऱ्यांना शेतात सहज जाता यावे, शेतमाल बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यास सुलभ व्हावे, या उद्देशाने शास-नाने मातोश्री शेतपांदण रस्ते बांधकामास सुरवात केली आहे. तरीसुद्धा शेतपांदण रस्त्याचे बांधकाम कालव्यावरून असलेल्या दळणवळण रस्त्यावर केले जात आहे. त्यामुळे हा विषय चर्चेचा ठरत आहे.

### रस्ता बांधकामाची चौकशी व्हावी

**शासनाने बोरगाव ते सुखपूर कालवा दळणवळण रस्त्याच्या बांधकामाची चौकशी करून योग्य शेतपांदण रस्त्यावर नव्याने मातोश्री शेतपांदण रस्ता बांधकाम मंजूर करावा व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.**

### मंजुरीचे पत्र अद्याप जारी केलेले नाही

**मंजुरीसाठी विनंती प्राप्त झाली आहे. तथापि, काही त्रुटींमुळे या टप्प्यावर मंजुरीचे पत्र जारी करण्यात आलेले नाही.**

**- राजीव कुरेकर,**
**कार्यकारी अभियंता, गोंदिया लघु सिंचन विभाग**

## सेंद्रिय भाजीपाला व रोपवाटिका: उमेद योजनेतून ग्रामीण अर्थकारणाला चालना

**गोंदिया,:** आमगाव तालुक्यातील केलसर येथे "समृद्ध CLF गट" मार्फत सेंद्रिय भाजीपाला व रोपवाटिका प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यात येत असून, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना व शेतकऱ्यांना रोजगार आणि उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध झाले आहे. "सूक्ष्म प्रकल्प सन २०२४-२५" अंतर्गत सुमारे ४५ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाने अल्प-ावधीतच उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या प्रकल्पाची दररोज २ टन उत्पादनाची क्षमता असून, एकूण १८० सदस्य या उपक्रमाशी जोडले गेले आहेत. रोपवाटिकेसाठी ४.५ एकर तर भाजीपाल्यासाठी तब्बल ४५ एकर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला उत्पादनावर भर देण्यात आल्याने बाजारात या उत्पादनांना चांगली मागणी मिळत आहे.

या प्रकल्पाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती झाली असून, सुमारे ५०० कुटुंबांना या उपक्रमातून उपजीविकेचा आधार मिळाला आहे. महिलांच्या स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून चालणाऱ्या या प्रकल्पामुळे त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही मोठी चालना मिळाली आहे.

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून आरोग्यदायी अन्ननिर्मिती, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत शेतीचा मार्ग या प्रकल्पातून पुढे येत आहे. भविष्यात अशा उपक्रमांची संख्या वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्याचा प्रशासनाचा मानस आहे.


महाराष्ट्र शासन

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपुर**

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

### कार्यकारी अभियंता,
### बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग,गोंदिया

**सिव्हील लाईन, गोंदिया-४४१६०१ दुरध्वनी क्र.०७१८२-२३७३१५,**
**ई-मेल:** gndbiid@gmail.com

### ई-निविदा सुचना क्र.०२ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन (दुरध्वनी क्र.०७१८२-२३७०७७) हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत पंजीबद्ध असलेल्या **खुल्या निविदा** तथा **सुशिक्षीत बेरोजगार** अभियंता कडून ब-१ नमुन्यातील (टक्केवारी दराने) मोहोरबंद निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा विक्री तसेच मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता,बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग,गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

निविदा विवरण

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग/ पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | इटियाडोह प्रकल्पाअंर्गत वडसा उपविभागातील कोरंभी शाखेअंतर्गत खरीप हंमाग २०२६-२०२७ करिता मजूरांचा खर्च | रु.४,९९,८७६/- | रू.५,०००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १.८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ८ व त्यावरील सर्व पात्र | ०६ महिने |
| २. | इटियाडोह प्रकल्पाअंतर्गत वडसा उपविभागातील वडसा शाखेअंतर्गत खरीप हंगाम २०२६-२०२७ करिता मजुरांचा खर्च | रु.४,९९,८७६/-- | रु.५,०००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी नोंदणी वर्ग ८ व त्यावरील सर्व पात्र | ०६ महिने |
| ३. | इटियाडोह प्रकल्पाअंतर्गत वडसा उपविभागातील कोंढाळा शाखेअंतर्गत खरीप हंगाम २०२६-२०२७ करिता मजुरांचा खर्च | रु.४,९९,८७६/- | रु.५,०००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ८ व त्यावरील सर्व पात्र | ०६ महिने |
| ४. | इटियाडोह प्रकल्पाअंतर्गत वडसा उपविभागातील आरमोरी शाखेअंतर्गत खरीप हंगाम २०२६-२०२७ करिता मजुरांचा खर्च | रु.४,९७,३३०/- | रु.५,०००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ८ व त्यावरील सर्व पात्र | ०६ महिने |
| ५. | बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया अंतर्गत उपविभाग आमगांव व भंडारा सिंचन मंडळ या कार्यालयात कंत्राटी पद्धतीने वाहन चालक पुरविण्याचे काम | रु.४,१९,७४०/- | रु.४,२००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ८ व त्यावरील सर्व पात्र | १२ महिने |
| ६. | विभागीय स्तरावर वाहन पुरविण्याचे काम | रु.२,५२,०००/- | रु.२,६००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग ९ व त्यावरील सर्व पात्र | १२ महिने |
| ७. | पुर नियंत्रण करण्याकरिता सिरपुर, कालीसरार व पुजारीटोला धरण मध्ये Mechanic,Electrician व मजूर लावण्याचे काम | रु.८,३७,५८०/- | रु.८,५००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता गोंदिया जिल्हा करिता | ०६ महिने |
| ८. | बाघ प्रकल्पा अंतर्गत आमगांव उपविभागातील बाघ डावा मुख्य कालवा अंतर्गत कि.मी.०.०० ते १५.०० पर्यंत खरीप हंगाम २०२६-२०२७ करिता मजुर लावणे | रु.४,१६,०५४/- | रु.४,२००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता गोंदिया जिल्हा करिता | ०६ महिने |
| ९. | बाघ प्रकल्प अंतर्गत आमगांव उपविभागातील बाघ डावा मुख्य कालवा अंतर्गत कि.मी. १५.०० ते ३३.०० पर्यंत खरीप हंगाम २०२६-२०२७ करिता मजूर लावणे | रू.४,१६,०५४/- | रु.४,२००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता गोंदिया जिल्हा करिता | ०६ महिने |
| १०. | बाघ प्रकल्प अंतर्गत आमगांव उपविभागातील बाघ उजवा मुख्य कालवा अंतर्गत कि.मी. ०.०० ते २९.०० पर्यंत खरीप हंगामा २०२६-२०२७ करिता मजुर लावणे. | रु.५,०३,२९१/- | रु.५,१००/- | रू. १,०००/-+ जिएसटी १,८०/- एकुण १,१८०/- | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता गोंदिया जिल्हा करिता | ०६ महिने |

**अ) निविदा विक्री कालावधी :- १५.०७.२०२६ ते दि.२२.०७.२०२६ (सकाळी १०.०० ते सायं.१७.०० वाजे पर्यंत)**
**ब) निविदा सादरीकरण कालावधी :- दि.२२.०७.२०२६ वेळ १४.०० वाजेपर्यंत**
**क) निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.२४.०७.२०२६ वेळ १६.०० वाजेपासून**

१) कोऱ्या निविदा प्रपत्राची रक्कम रोखीने स्विकारण्यात येईल.
२) निविदेचा दोकर अंदाजपत्रकिय किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असल्यास निविदा किंमतीच्या १०% परंतु कमीत कमी १,०००/- उदा.३.०० ते १०% पर्यंत कमी दाराकरिता १% परफॉमन्स सिक्युरिटी डी.डी. लिफाफा क्र.२ उडघल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या (L1) निविदाकाराने (२) दोन कामाकाजाच्या दिवसांत विभागीय कार्यालयात जमा करावा.
३) भरुन पाठविलेल्या मोहोरबंदा निविदा **कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांचे कार्यालतास दि.२४.०७.२०२६ रोजी सायंकाळी १४.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील व दि.२४.०७.२०२६ रोजी दुप-ारी १६.०० वाजेपासून (शक्य झाल्यास) निविदाकाराचे समक्ष किंवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष निविदा उघडण्यात येतील.**
४) कोणतीही निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्याने राखून ठेवला आहे.

**स्वाक्षरी**
**(सोनाली एस.सोनुले)**
**कार्यकारी अभियंता**
**बाघ व इटियाडोह पाटबंधारे विभाग,गोंदिया**

जा.क्र./१४४०/निलि/२०२६ दिनांक ०७/०७/२०२६
जिमाका/गों/जाहि/४१/२०२७


# सखी वन स्टॉप सेंटरच्या मदतीने बिहार आणि भुसावळ बेपत्ता महिला १ महिन्यानंतर सुखरूप घरी



**गोंदिया:-** गोंदिया येथील सखी वन स्टॉप सेंटरच्या संवेदनशील आणि जलद कार्यवाहीम ुळे बिहार आणि भुसावळ येथील गेल्या १ महिन्यापासून बेपत्ता असलेल्या दोन महिला आता सुरक्षितपणे आपल्या घरी पोहोचल्या आ-हेत. जिल्हा महिला व बालविकास विभागांतर्गत के.टी.एस रुग्णालयात २४७ कार्यरत असलेल्या या केंद्राने पुन्हा एकदा आपली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

### बिहारच्या रिंकूदेवीचा रावणवाडीत शोध

बिहार राज्यातील नालंदा जिल्ह्यातील ४० वर्षीय रिंकूदेवी राजकुमार साव या मागील १ महिन्यापासून बेपत्ता होत्या. कुटुंबीय त्यांचा सर्वत्र शोध घेत होते. ४ जुलै २०२६ रोजी गोंदिया जिल्ह्यातील रावणवाडी गावाजवळ एक महिला एकट्याने भरकटत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या लक्षात आले. नागरिकांनी तातडीने ११२ क्रमांकावर कॉल करून पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन रिंकूदेवी यांना ताब्यात घेतले आणि पुढील संरक्षणासाठी त्यांना सखी वन स्टॉप सेंटर, गोंदिया येथे दाखल केले.

### भुसावळच्या रेखा राठोड रामनगरमध्ये आढळल्या

दुसरी घटना रामनगर पोलीस ठाणे हद्दीतील आहे. २० जून २०२६ रोजी रात्री पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांना भुसावळ जिल्ह्यातील रेखा तुकडीदास राठोड या महिला आढळल्या. त्या मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याने आणि व्यवस्थित माहिती न देऊ शकल्याने पोलिसांनी काळजी आणि संरक्षणाच्या दृष्टीने त्यांना सखी वन स्टॉप सेंटरमध्ये दाखल केले.

### समुपदेशनातून कुटुंबीयांपर्यंत संपर्क

सखी केंद्रातील समुपदेशकांनी दोन्ही महिलांशी संवाद साधून त्यांची संपूर्ण माहिती घेतली. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन संपर्क साधला. कुटुंबीयांनी सांगितले की ते गेल्या १ महिन्यापासून महिलांचा शोध घेत होते. ५ जुलै रोजी बिहारमधील रिंकूदेवी यांचे कुटुंबीय सखी केंद्रात दाखल झाले. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून केंद्रप्रशासक मधु बिसेन आणि कर्मचाऱ्यांनी रिंकूदेवी यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. त्याचप्रमाणे भुसावळच्या रेखा राठोड यांनाही त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. सखी केंद्राच्या मदतीने दोन्ही महिला आता सुरक्षितपणे घरी पोहोचल्या आहेत.

या संपूर्ण कार्यात केंद्रप्रशासक मधु बिसेन यांच्या मार्गदर्शनाखाली वैशाली सांगाडे, लीना बुराडे, काजोल करवाडे, भूषण भेलावे, सविन राऊतकर, प्रीती नागरीकर, श्रद्धा कोडे आणि दुर्गा बेबाम यांनी मोलाचे सहकार्य केले.

सखी वन स्टॉप सेंटर, गोंदिया हे हिंसा, अपघात किंवा बेपत्ता झालेल्या महिलांना २४७ मोफत मदत, समुपदेशन, पोलीस मदत, वैद्यकीय आणि कायदेशीर सहाय्य पुरवते. हे केंद्र जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आणि परिविक्षा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली चालते. नागरिकांना आवाहन आहे की अशा बेवारस महिलांना पाहिल्यास तातडीने ११२ किंवा १८१ हेल्पलाइनवर संपर्क साधावा.

# लोकसंख्येच्या प्रमाणात महाज्योतीला १,५०० कोटींचा निधी द्या – आमदार फुके विधानपरिषदेत गरजले

### ओबीसी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी डॉ. परिणय फुके यांची विधान परिषदेत जोरदार मागणी



**मुंबई :** महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांना १,५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी आज विधान परिषदेत केली. महाज्योतीला सध्या मिळणारा निधी ओबीसी समाजाच्या लोकसंख्येच्या तुलनेत अत्यंत अपुरा असून, शासनाने याबाबत दिलेल्या आश्वासनाची तातडीने पूर्तता करावी, अशी मागणीही त्यांनी केली.विशेष म्हणजे महाराष्ट्रात सकल ओबीसी महामोर्चा,ओबीसी जनमोर्चा,ओबीसी संघर्ष समिती व ओबीसी अधिकार मंचच्यावतीने सातत्याने महाज्योती संस्थेला लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याची मागणी आंदोलन व निवेदनातून करण्यात येत आहे,त्याची दखल आमदार डॉ.फुके यांनी घेत विधानपरिषदेत आपला आवाज बुलंद केल्याचे आज बघावयास मिळाले.

महाज्योतीला मिळणाऱ्या निधीबाबत नाराजी व्यक्त करताना डॉ. फुके म्हणाले की, राज्य शासनाकडून सारथी, बार्टी आणि महाज्योती या तिन्ही संस्थांना जवळपास समान निधी दिला जातो. मात्र सारथी ही संस्था सुमारे १६ टक्के मराठा समाजासाठी, बार्टी ही संस्था १३ टक्के अनुसूचित जाती समाजासाठी, तर महाज्योती ही संस्था राज्यातील जवळपास ६० टक्के ओबीसी समाजासाठी कार्यरत आहे. ओबीसी समाजात साडेतीनशेहून अधिक जातींचा समावेश असून सुमारे ७ कोटी नागरिकांच्या शैक्षणिक व कौशल्य विकासाची जबाबदारी महाज्योतीवर आहे. अशा परिस्थितीत इतर संस्थांइतकाच निधी देणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. फुके यांनी सभागृहात सांगितले की, मागील अधिवेशनात महाज्योतीला १,५०० कोटी रुपयांचा निधी देण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली होती. तसेच तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याचे मान्य केले होते. त्यामुळे शासनाने आता विलंब न करता महाज्योतीला १,५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी त्यांनी ठाम मागणी केली.या चर्चेला उत्तर देताना इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी महाज्योतीचा निधी १,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे.तसेच अंतिम मंजुरी अद्याप मिळालेली नसली तरी आतापर्यंत महाज्योतीसाठी ७२८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे सांगितले.त्यापैकी ४९९ कोटी रुपये विविध योजनांच्या अनुदानासाठी, १ कोटी रुपये वेतनासाठी, तर नागपूर येथे महाज्योतीची प्रशासकीय इमारत व वसतिगृह तसेच नाशिक येथे वसतिगृह उभारणीसाठी २२८ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मंत्री सावे यांनी महाज्योतीमार्फत ६,९०० प्रशिक्षणार्थी तसेच १४ हजार विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणासाठी प्रशिक्षण आणि सहाय्य दिले जात आहे. पीएच.डी. विद्यार्थ्यांनाही अनुदान देण्यात येत असून, संस्थेच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये १००, एमपीएससीमध्ये ३७१, तसेच लष्कर, बँकिंग आणि इतर विविध क्षेत्रांत सुमारे २ हजार विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. महाज्योतीच्या बळकटीकरणाचा मुद्दा आमदार डॉ. परिणय फुके यांनी यापूर्वीही सातत्याने विधान परिषदेत उपस्थित केला आहे. ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि परदेशी शिक्षणासाठी अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी महाज्योतीला लोकसंख्येच्या प्रमाणात भक्कम आर्थिक तरतूद करणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी वेळोवेळी मांडली आहे.यावेळीही त्यांनी शासनाला मागील आश्वासनाची आठवण करून देत, ओबीसी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी महाज्योतीला १,५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची मागणी जोरदारपणे लावून धरली.

# व्याघ्र प्रकल्पांमध्ये निसर्ग शिक्षण

### वन्यजीव संवर्धनासाठी शासनाचा पुढाकार



**गोंदिया** – वन, वन्यजीव आणि जैवविविधतेच्या संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्यातील सर्व व्याघ्र प्रकल्पांमध्ये शालेय निसर्ग शिक्षण व वन्यजीव जनजागृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या उपक्रमांतर्गत व्याघ्र प्रकल्पांच्या हद्दीत किंवा सीमारेषेपासून दोन किलोमीटर परिसरातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी एक विनामूल्य शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येणार आहे. यात जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच मान्यताप्राप्त खाजगी शाळांचा समावेश राहणार असून, विद्यार्थ्यांची निवड संबंधित शाळेच्या इको क्लबमार्फत केली जाणार आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून ९ जुलै रोजी दिलेल्या पत्रकानुसार सहलीसाठी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची संपूर्ण व्यवस्था संबंधित व्याघ्र प्रकल्पामार्फत विनामूल्य करण्यात येणार आहे. दरम्यान, २० ते ३० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची बस किंवा मिनिबस उपलब्ध करून दिली जाणार असताना यासाठी विद्यार्थी अथवा शाळांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शकांसह जंगल सफारी किंवा निसर्गभ्रमंती, निसर्ग माहिती केंद्रांना भेट, वन अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद, शैक्षणिक माहितीपटांचे प्रदर्शन, प्रश्नमंजूषा, पोस्टर स्पर्धा तसेच जैवविविधता आणि मानव वन्यजीव सहअस्तित्वावरील विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे. कार्यक्रमाची प्रभावी

अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्र संचालकांनी शिक्षण विभाग, इको क्लब, शैक्षणिक संस्था व स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. प्रत्येक व्याघ्र प्रकल्पाने वार्षिक कृती आराखडा तयार करून त्यामध्ये सहभागी शाळांची यादी, शैक्षणिक भेटींचे वेळापत्रक आणि लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संवर्धनाबाबत जबाबदारीची भावना निर्माण करून पर्यावरणपूरक आणि संवर्धनासाठी सक्रिय नागरिकांची नवी पिढी घडविण्याचा शासनाचा उद्देश आहे. दरम्यान, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पांतर्गत गेल्यावर्षी १६ शाळांमध्ये उपक्रम राबविण्यात आले. यात यंदा ५२ शाळांचा समावेश करण्यात आला असून २ हजार ६०० विद्यार्थी सहभागी होणार आहे.

**प्रीतमसिंग कोडापे,**
**उपसंचालक, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया**

# गोंदिया जिल्ह्यातील विकास प्रकल्प वनविभागाच्या जाळ्यात



**गोंदिया** – महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी चर्चेदरम्यान अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार राजकुमार बडोले यांनी गोंदिया जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या विकास प्रकल्पांना वनविभागामुळे येत असलेल्या अडचणींकडे सदनाचे लक्ष वेधले. १९७३ मध्ये मंजूर झालेल्या निमगाव प्रकल्पासारख्या जुन्या योजनांनाही १९८० च्या वनसंवर्धन कायद्यानंतर अनावश्यक अडथळे निर्माण करण्यात आले असल्याचे विधान त्यांनी केले.

पूर्वमंजूर प्रकल्पांनाही अडथळे–आमदार बडोले यांनी सभागृहात सांगितले की, निमगाव प्रकल्प १९७३ मध्ये मंजूर झाला होता. त्यावेळी वनसंवर्धन कायदा अस्तित्वात नव्हता. मात्र १९८० मध्ये हा कायदा आल्यानंतर या प्रकल्पाला विविध परवानग्यांसाठी पुन्हा पाठवण्यात आले आणि तो आजही प्रलंबित आहे. ‟वनसंवर्धन कायद्याच्या अंमलबजावणीनंतर पूर्वमंजूर प्रकल्पांना का अडकवले जाते?” असा प्रश्न उपस्थित करत बडोले यांनी राज्यातील असेच अनेक प्रकल्प वनविभागाच्या प्रक्रियेमुळे वर्षानुवर्षे रखडल्याचे निदर्शनास आणले.

झाशीनगर प्रकल्प आणि व्याघ्र प्रकल्पाची अडचण–अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील झाशीनगर प्रकल्प वारंवार बैठका घेऊनही मार्गी लागत नसल्याचे आमदार बडोले यांनी सांगितले. याशिवाय व्याघ्र प्रकल्पामुळे जिल्ह्यातील अनेक गावे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिली आहेत. रस्ते, सिंचन, पर्यटन आणि इतर मूलभूत सुविधांच्या कामांना वनविभागाकडून अडथळे येत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.‟प्रकल्प मंजूर झाल्यानंतरही वनविभागाकडून अशा अडचणी निर्माण केल्या जातात. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी, ग्रामस्थ आणि युवक विकासापासून वंचित राहत आहेत,” असे आमदार बडोले म्हणाले.

वनमंत्री गणेश नाईक यांचे आश्वासन–या लक्षवेधीवर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी सर्व संबंधित प्रश्नांची सविस्तर बैठक घेऊन लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राजकुमार बडोले यांचे प्रयत्न–गोंदिया जिल्हा वनक्षेत्राने समृद्ध असल्याने विकास प्रकल्पांना वनविभागाची परवानगी घेणे आवश्यक असते. मात्र अनेकदा पर्यावरणीय परवानग्या, वन्यजीव संरक्षण नियम आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे प्रकल्प रखडतात. यामुळे स्थानिक जनतेच्या विकासाच्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. आमदार बडोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर लवकरच सकारात्मक निर्णय झाल्यास जिल्ह्यातील अनेक गावांना आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यातील दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान




**गोंदिया :** कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील प्रिती टेंभरे यांना जिजामाता कृषीभूषण पुरस्काराने तर दादा फुंडे यांना उद्यान पंडीत पुरस्काराने राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांच्या हस्ते नुकतेच गौरविण्यात आले.राज्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व अधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा एक जुलै कृषी दिनानिमित्त वरळी, मुंबई येथे कृषि विभाग, महाराष्ट्र शासन तर्फे आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम राज्यपाल यांच्या अध्यक्षतेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासह विविध विभागातील वरिष्ठ अधिकारी, शेतकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गोंदिया जिल्ह्यातील दोन प्रगतीशील शेतकऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.


कृषी पुरस्कारांची माहिती : राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी विविध गटांमध्ये कृषी पुरस्कार प्रदान केले जातात. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न, वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, सेंद्रिय शेती कृषीभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, उद्यान पंडीत, युवा शेतकरी आणि शेतीनिष्ठ शेतकरी असे आठ प्रमुख पुरस्कारांचा समावेश आहे. हे पुरस्कार शेती, फलोत्पादन व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, संस्था व गटांना दिले जातात.

प्रिती ऋषी टेंभरे (चुटिया, ता.गोंदिया) जिजामाता कृषी पुरस्काराने सन्मानित : सौ. प्रिती टेंभरे यांना सन २०२३ चा जिजामाता कृषीभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार केवळ महिला शेतकऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट कृषी कार्यासाठी दिला जातो. त्यांनी गांडूळ खत व अझोला उत्पादन युनिट उभारून सेंद्रिय शेतीला चालना दिली आहे. भात पिकासाठी दर्जेदार बियाण्यांची निवड, फळ–भाजीपाला लागवडीसाठी उत्तम रोपे व कलमे, तसेच फेरोमन सापळे व पक्षी थांबे यांचा वापर करून त्यांनी आधुनिक शेती पद्धती आत्मसात केल्या आहेत. पंचायत समिती गोंदियातर्फेही त्यांना प्रगतशील शेतकरी म्हणून गौरवण्यात आले आहे.

दादा रामाजी फुंडे (खैरी, ता.अर्जुनी मोरगाव) उद्यान पंडित पुरस्काराने सन्मानित : श्री. दादा फुंडे यांना सन २०२३ चा उद्यान पंडीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. फलोत्पादन क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. त्यांनी आंबा, पेरू, चिकू, सीताफळ तसेच विविध भाजीपाला पिकांची यशस्वी लागवड केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिकेद्वारे त्यांनी दर्जेदार रोपे तयार करून विक्री केली असून सेंद्रिय शेती तंत्रांचा प्रभावी वापर केला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील या दोन्ही शेतकऱ्यांनी आपल्या कार्यातून इतरांसाठी आदर्श निर्माण केला असून त्यांच्या यशामुळे जिल्ह्याचा गौरव वाढला आहे, अशी प्रतिक्रिया जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी निलेश कानवडे यांनी व्यक्त केली

# फार्म हाऊसमध्ये आढळला बिबट्याचा पिल्लू



**एकोडी:** नजिकच्या सहेसपूर येथील शंकरटोली परिसरातील एका खासगी फार्म हाऊसमध्ये (ता. १४) सकाळी बिबट्याचा पिल्लु आढळला. दरम्यान हा पिल्लु बिबट्याने सोडला असावा, असा कयास लावला जात असून वनविभागाने सध्या बिबट्याच्या पिल्लुवर त्याच ठिकाणी निगराणी ठेवली असून कॅमेरे सुध्दा लावले आहेत. या प्रकाराने मात्र परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


सविस्तर असे की, शंकरटोली परिसरातील एका शेतकऱ्याच्या शेतात प्लास्टिक मल्चिंग केलेल्या बांधावर एक प्रौढ मादी बिबट्या फिरत असल्याचे काही शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यानंतर काही वेळाने, त्याच शेतातील फार्म हाऊसमध्ये ठेवलेल्या पाईप्स आणि इतर शेती साहित्याच्या आडोशाला एक छोटे बिबट्याचे पिल्लू लपून बसलेले आढळले. या पिल्लाचे वय अंदाजे २ ते ३ महिने असावे, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. वन्यजीव अभ्यासकांच्या मते, मादी बिबट्या अनेकदा शिकारीसाठी जाताना आपल्या पिल्लांना सुरक्षित जागी लपवून ठेवते, ही घटनाही त्याच प्रकारातील आहे, असे मानले जात आहे. फार्म हाऊसमध्ये पिल्लू दिसताच स्थानिक शेतकऱ्यांनी वन

विभागाला या घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी आपल्या रेस्क्यू पथकासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मादी बिबट्या आपल्या पिल्लाला शोधत परत येण्याची आणि त्याला घेऊन जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे निसर्गाच्या नियमानुसार पिल्लाला कोणताही मानवी स्पर्श न करता, त्याला त्याच ठिकाणी या सुरक्षित ठेवण्यात आले आहे. वन विभागाने परिसरात मादी बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी तात्काळ ‟कॅमेरे लावले आहेत. एंकदरीत या प्रकाराने सहेषपूर, एकोडी, सेजगाव, शंकरटोली, कास्टोला आदि परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांची बाहेर पडताना सावधगिरी बाळगावी व बिबट आढळलेल्या ठिकाणापासून दूर रहावे, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

### गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखड्याला गती;२९३ गावांचा समावेश

**गोंदिया,:** हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडा तयार करण्यावर भर देण्यात येत आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा २ अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यातील २९३ गावांची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पामध्ये वैयक्तिक लाभाच्या बाबी, शेतकरी गट/कंपन्यांचे कृषी उद्योग प्रकल्प, मृद व जलसंधारण कामे, हवामान अनुकूल कृषी तंत्रज्ञानाचा वापर तसेच पर्यावरणीय संरक्षण यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२३ रोजी या प्रकल्पाच्या टप्पा २ ला मंजुरी देण्यात आली असून, सुमारे ६००० कोटी रुपयांचा अंदाजित खर्च निश्चित करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्यानंतर १४ ऑक्टोबर २०२४ रोजी गाव निवडीस मान्यता देण्यात आली, तर ८ जुलै २०२५ रोजी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस अंतिम मान्यता देण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील ५९ शाळांना शिक्षकांची प्रतिक्षा !



**गोंदिया :** अलीकडे जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. तर दुसरीकडे शिक्षकांच्या चाणव्यामुळे शिक्षणाचा बोजवारा उडत असल्याचा नकार गोंदिया जिल्ह्यात समोर आला आहे. शिक्षकांच्या कमतरतेमुळे अनेक शाळा शुन्य शिक्षकी झाल्या आहेत. जिल्ह्यातील ५९ शाळांना शिक्षकांची प्रतिक्षा आहे. त्यामुळे राज्याचे शिक्षण विभागाच ग्रामीण क्षेत्रातील जि. प. शाळांच्या शैक्षणिक दर्जेला घेवून उदासीन असल्याची प्रतिक्रिया पालकांकडून उमटू लागली आहे.

ग्रामीण क्षेत्रामध्ये शिक्षणाचे मंदिर म्हणून जिल्हा परिषद शाळांची ओळख आहे. मात्र शिक्षणाचे बाजारीकरण आणि ग्रामीण क्षेत्रातील शिक्षणाला घेवून राज्य सरकारचे उदासीन धोरण आजघडीला जि.प. शाळांच्या अस्तित्वासाठी

धोक्याची घंटा ठरले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जि.प. च्या शिक्षण विभागात शिक्षकांचा वाणवा कायम असून खालावल्या शैक्षणिक दर्जाचे देखील कारणीभूत ठरत आहे. या प्रकाराला जि. प. प्रशासन देखील हतबल असल्याचे पहावयास मिळत आहे. पर्यायाने शाळांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी जि. प. प्रशासनाकडून शिक्षण स्वयंसेवक नियुक्तीसाठी पुढाकार घ्यावा लागला. त्यामुळे गावात शिक्षित युवक–युवतींना स्वयंसेवक म्हणून जबाबदारी देण्यात आली. आणि तेच स्वयंसेवक जिल्ह्यातील ५९ शाळांना टिकवून ठेवण्याचे काम करीत आहेत.

गोंदिया जिल्ह्यातील ५९ शाळा शुन्य शिक्षिकी ठरल्या आहेत. या शाळांना शिक्षकांची प्रतिक्षा आहे. २१ जूनपासून नविन शैक्षणिक सत्राला

सुरूवात होणार आहे. या नव्या क्षेत्रात देखील शिक्षक मिळणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.


### ना मुख्याध्यापक.. ना शिक्षक....

जि.प. शाळांच्या प्रशासनात मुख्याध्यापक, सहायक शिक्षक या पदांना मान्यता आहे. मात्र जिल्ह्यातील ५९ शाळा शिक्षकाविनाच भरत आहेत, या शाळांमध्ये ना मुख्याध्यापक... ना सहायक शिक्षक फक्त शिक्षणाचे धडे देण्यासाठी स्वयंसेवकच पहावयास मिळतात. उल्लेखनिय असे की, या शाळांमध्ये केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी भिरकताना दिसून येत नाही, आहे, त्या अवस्थेत या शाळा जशातशा अखेरच्या घटका मोजत आहेत. यामुळे सरकारचा शाळा बंद पाहण्याचा घाट तर नव्हे अशी शंका–कुशंकाही व्यक्त होवू लागली आहे.

### सर्वाधिक शुन्य शिक्षकी शाळा देवरीत

गोंदिया जिल्हा आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यातल्यात्यात सालेकसा व देवरी हे दोन तालुके दुर्गम क्षेत्रामध्येही मोडतात. फलस्वरूप या दोन्ही तालुक्यात शुन्य शिक्षकी शाळांची संख्याही अधिक आहे. देवरी तालुक्यातील तब्बल ११ शाळा शुन्य शिक्षकी आहेत. त्याचबरोबर सालेकसा, आमगाव, तिरोडा या तीन तालुक्यात प्रत्येकी १ शाळा, गोरेगाव तालुक्यात ८. गोंदिया तालुक्यात ६, अर्जुनी मोरगाव तालुक्यात ४ शाळा शुन्य शिक्षकी आहेत.

# शासकीय इमारतीमधील रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा गायब




**गोंदिया :** दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की, शासकीय पातळीवरून पाणीटंचाईवर कमालीची चिंता व्यक्त केली जाते. सर्वसामान्य जनतेला मपाणी वाचवा, पाणी जिरवाफ आणि मरेनवॉटर हार्वेस्टिंग करा अशा विविध जाहिराती आणि मोहिमांद्वारे उपदेशाचे डोस पाजले जातात. मात्र, स्वतःच्या दारात नेमकी काय परिस्थिती आहे, याकडे प्रशासन सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. नगररचना नियमांनुसार १०० चौरस मीटरपेक्षा जास्त छताचे क्षेत्रफळ असलेल्या सर्व नवीन शासकीय, निमशासकीय आणि सार्वजनिक इमारतींवर पर्जन्यजल संचयन (रेनवॉटर हार्वेस्टिंग) प्रणाली बसवणे कायद्याने बंधनकारक आहे. असे असताना जिल्ह्यातील बहुतांश शासकीय कार्यालयांमध्ये ही यंत्रणा उभारलीच गेलेली नाही. या प्रशासकीय अनास्थेमुळे पावसाचे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. तर

दुसरीकडे लोकांना रेनवॉटर हार्वेस्टिंग सल्ला दिला जात आहे.

गोंदिया जिल्ह्यात लहान–मोठी अनेक शासकीय कार्यालये व शासकीय इमारती आहेत. जिथे अद्याप रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा उभारण्यात आलेली नाही. यामध्ये जिल्हा मुख्यालयी असलेल्या काही प्रमुख कार्यालयांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे, ज्या मोजक्या शासकीय इमारतींमध्ये ही यंत्रणा बसवण्यात आली आहे, तिथेही योग्य देखभाल

दुरुस्तीअभावी पाईप तुटले आहेत, तर काही ठिकाणी कचरा साचून संपूर्ण यंत्रणेची प्रचंड दुरवस्था झाली आहे. प्रशासनाच्या याच कमालीच्या अनास्थेमुळे दरवर्षी पावसाळ्यात लाखो लिटर शुद्ध पाणी वाहून जाते आणि भूजल पातळी वाढण्यास कोणतीही मदत होत नाही. याला प्रशासकीय अनास्था कारणीभूत असल्याची चर्चा आहे. त्यातही यंत्रणा मात्र सर्वसामान्य नागरिकांना रेनवॉटर हार्वेस्टिंगचे फायदे मोजून दाखवित आहे. शिवाय घरी सदर यंत्रणा बसविण्याचा सल्लाही दिला जात आहे. त्यामुळे मदुसऱ्यांना सांगे ज्ञान–आपण

मात्र कोरडे पाषाणफ अशीच अवस्था जिल्ह्यातील शासकीय यंत्रणेची झाली आहे.

### नियम केवळ सामान्यांसाठीच ?

**नगररचना विभागाच्या नियमांनुसार खाजगी इमारतींनी या नियमाचे उल्लंघन केल्यास त्यांना इमारतीचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळत नाही. मात्र, शासकीय इमारतीना हा नियम लागू पडत नसल्याचे चित्र जिल्ह्यात दिसत आहे. जुन्या शासकीय इमारतीमध्ये ही यंत्रणा बसवण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद नसणे, तसेच कार्यालयातील प्रमुखांना जलसंधारणाच्या आणि पर्यावरणपूरक कामात फारसा रस नसल्याने याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. अनेक ठिकाणी जुन्या यंत्रणांचे पाईप फुटले असले, तरी सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा संबंधित यंत्रणा वर्षानुवर्षे त्याची दुरुस्ती करत नसल्याने सरकारी दावे कागदावरच उरले आहेत.**

### काय आहेत रेनवॉटर हार्वेस्टिंगचे फायदे ?

**भूजल पातळीत वाढः पावसाचे पाणी छतावरून पाईपद्वारे गोळा करून जमिनीत विहिरी किंवा बोअरवेलमध्ये जिरवल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने वाढण्यास मदत होते.**

**पाणीटंचाईवर मातः योग्य संचयन केल्यामुळे उन्हाळ्यात विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत नाहीत आणि टँकरने पाणी मागवण्याची गरज भासत नाही. पाण्याचा दर्जा सुधारतोः जमिनीतील पाण्याचा खारेपणा कमी होऊन पाण्याची गुणवत्ता नैसर्गिकरीत्या सुधारते.**